सिंधुदुर्ग, बुधवार, १६ मार्च २०२२ शहर-जिल्हा पुढारी

# दोडामार्ग लक्ष्मीबाई हळबे कॉलेजच्या क्रीडा महोत्सवाचा शुभारंभ

**दोडामार्ग :** प्रत्येक विद्यार्थ्याला क्रीडा महोत्सवाची गरज असते. खेळांमुळे शरीरातील आळस, थकवा दूर होतो व शरीराला एक चांगली सवय लागते. शिवाय आरोग्यसुद्धा सुदृढ राहण्यास मदत होते, असे मत नगराध्यक्ष चेतन चव्हाण यांनी व्यक्त केले.

येथील लक्ष्मीबाई सीताराम हळबे महाविद्यालयाच्या क्रीडा महोत्सवाचे उद्‌घाटन श्री. चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ते ओलत होते. प्राचार्य डॉ. सुभाष सावंत व अन्य प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते. श्री. चव्हाण म्हणाले, आजच्या काळात विद्यार्थी मोबाईलवरील तासन्‌तास खेळतात. परिणामी त्यांचे शरीर अनेक आजारांना निमंत्रण देते. विद्यार्थ्यांना उत्तम आरोग्यासाठी मैदानी खेळ खेळणे आवश्यक आहे. प्राचार्य डॉ. सुभाष सावंत यांनीही क्रीडा महोत्सवाविषयी मनोगत व्यक्त केले. या क्रीडा महोत्सवात कबड्डी, गोळा फेक, लांब उडी, थाळीफेक, उंच उडी, १०० मीटर धावणे, १६०० मीटर धावणे, रीले, क्रिकेट, बुद्धिबळ, कॅरम या खेळात विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

प्रास्ताविक डॉ. संजय खडपकर यांनी तर सूत्रसंचालन किरण नाईक यांनी केले. आभार प्रा. प्रीती प्रसादी यांनी मानले.